**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सोपान बाजी जगताप
मु.पो.सायगाव, ता.जाळी, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत),
पंचायत समिती जावळी, ता.जावळी, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत सायगाव, ता.जावळी, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत),
पंचायत समिती जावळी, ता.जावळी, जि.सातारा श्री.सुनिल अनिल बोडरे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत सायगाव, ता.जावळी, जि.सातारा श्री.शरद बापुराव गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.९.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सायगाव ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात असलेली आपली वडिलोपार्जित जागा आपल्याला कोणतीही पूर्वकल्पना न देता ग्रामपंचायतीने १९३५ सालच्या गहाणखताच्या छायांकित प्रतीच्या आधारे १९९९ साली-म्हणजे ६४ वर्षांनी अन्य व्यक्तींच्या नावे केली. हा ठराव रद्द करून जागा आपल्या नावावर करण्याची विनंती आपण दि.२७.२.२००७ रोजी केली. याबाबतची माहिती व आपल्या मागणीबाबतच्या कार्यवाहीची माहिती दिड वर्ष होऊनही आपल्याला दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सोपान बाजी जगताप यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात व लेखी निवेदनात केली. काही माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सायगाव, ता.जावळी, जि.सातारा यांनी दिली. परंतु जमीन व्यवहाराची नोंद करताना त्याची कायदेशीर तपासणी केली जाते का, ठोस पुराव्याशिवाय मिळकतीच्या नोंदीत बदल करता येतो का, या मुलभूत मुद्दयांची माहिती दिलेली नाही, असे श्री.जगताप यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे.

श्री.जगताप यांनी खलासा अथवा स्पष्टीकरण मागणारे मुद्दे विचारले आहेत. ते वगळता ऊर्वरित मुद्दयांची माहिती शुल्क भरल्यानंतर दिली. सन १९९९ मध्ये केलेल्या नोंदीबाबतची ग्रामपंचायतीचा ठराव आदी सर्व माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सायगाव, ता.जावळी, जि.सातारा श्री.शरद बापुराव गायकवाड यांनी केले.

श्री.जगताप यांना माहिती देण्यात आली. परंतु ग्रामपंचायतीने घेतलेले ठराव चुकीचे असून त्या अनुषंगाने जमिनीचे ८-अ चे उतारे दुरूस्त करून मिळावेत, अशी श्री.जगताप यांची मागणी आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. त्यासाठी त्यांनी स्वतंत्रपणे दाद

मागावी याची कल्पना त्यांना देण्यात आली, असे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती जावळी, ता.जावळी, जि.सातारा श्री.सुनिल अनिल बोडरे यांनी सांगितले.

श्री.जगताप यांची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीबाबतची आहे. तथापि संबंधित नोंदीच्या अनुषंगाने कार्यवाहीबाबतची तक्रार असल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सायगाव, ता.जावळी, जि.सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती जावळी, ता.जावळी, जि.सातारा यांनी त्यांना देणे आवश्यक होते. मूळ मागणीच्या अनुषंगाने दिलेल्या माहितीच्या प्रतींसह केलेल्या कार्यवाहीचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सायगाव, ता.जावळी, जि.सातारा यांनी आयोगास तीन दिवसात सादर करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार सर्व प्रतींसह अहवाल जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सायगाव, ता.जावळी, जि.सातारा श्री.शरद बापुराव गायकवाड यांनी दि.१८.३.२००९ च्या पत्रान्वये सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२९.१.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप सिताराम देशपांडे
मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहा.अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग,
निरा उजवा कालवा, फलटण, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप सिताराम देशपांडे
मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहा.अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, पुणे श्री.भा.रा.बोकडे

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, निरा उजवा कालवा, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.दि.आ.पांढरे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.१०.२००८ व ७.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.१२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

१६९ किलोमीटर लांबीतील सिंचन क्षेत्रातील कालव्याच्या पाणी-चोरीच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.दिलीप सिताराम देशपांडे यांनी मागितली होती. प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात वस्तुस्थितीजन्य आढावा घेऊन माहिती देणे आवश्यक होते. कारण अशी माहिती अभिलेखाच्या स्वरूपात उपलब्ध नसते, असा आढावा घेऊन त्यांना माहिती देण्यात आली. मात्र काही मुद्दयांची माहिती आवश्यक नसल्याचे त्यांनी लेखी दिल्याने ऊर्वरित मुद्यांची माहिती विहित मुदतीत देण्यात आली. जादा शुल्क आकारल्याची व माहिती विहित मुदतीत मिळाली नसल्याची तक्रार त्यांनी त्यानंतर केली. त्याबाबत त्यांच्याशी चर्चा करून वस्तुस्थिती स्पष्ट केली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटंबधारे विभाग, निरा उजवा कालवा कार्यालय, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.दि.आ.पांढरे व अपिलीय प्राधिकारी तथा

सहा.अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, पुणे श्री.भा.रा.बोकडे यांनी केले. तसेच याच माहितीबाबतचे श्री.देशपांडे यांचे अ.क्र.२६७/सातारा, माहिती दिली असल्यामुळे यापूर्वी आयोगाने निकाली काढले असल्याचे त्यांनी नमूद केले. हे निवेदन व सादर केलेली पूरक कागदपत्रे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२८.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. काशीनाथ नामदेव जाधव — अपीलकर्ता
रा. बी.आय.टी. चाळ नं.१९, रूम नं.६४,
३रा मजला, केशवराव कदम मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी,
सातारा, तहसील कार्यालय आवार, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक, खंडाळा, ता. खंडाळा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.३.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. काशीनाथ नामदेव जाधव
रा. बी.आय.टी. चाळ नं.१९, रूम नं.६४,
३रा मजला, केशवराव कदम मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८

**अपिलीय प्राधिकारी** तथा — सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी,
सातारा, तहसील कार्यालय आवार, सातारा
श्री. यु. टी. मेहेत्रे

**जन माहिती अधिकारी** तथा — दुय्यम निबंधक, खंडाळा, ता. खंडाळा, जि.सातारा
श्री. आर. पी. गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.१०.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहीर नोटिशीमधील आपल्या जमिनीबाबतची माहिती आपण मागितली होती. या जमिनीबाबत काही खोटे व्यवहार झालेले आहेत. दुय्यम निबंधक, खंडाळा, ता. खंडाळा यांच्या कार्यालयात जमिनीच्या व्यवहाराबाबत स्वतंत्र इंडेक्स असून त्यामध्ये सर्व माहिती संकलित स्वरूपात असताना जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, खंडाळा यांनी ती दिली नाही. भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ च्या कलम ११(५) प्रमाणे शोध अर्ज सादर करून माहिती घ्यावी, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला कळविले व अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्यांचे म्हणणे मान्य केले. आपल्याला निःशुल्क माहिती मिळावी, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, खंडाळा व अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, सातारा यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. काशिनाथ नामदेव जाधव यांनी केली.

श्री. जाधव यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. त्यांनी मागणी केलेल्या नमुन्यात माहिती कार्यालयात ठेवली जात नसून व ती संकलित करून देणे शक्य नसल्यामुळे देता आली नाही. तसेच अशा स्वरूपाच्या माहितीसाठी नोंदणी अधिनियम, १९०८ नुसार शोध-अर्ज दाखल करून प्राप्त करून घेण्याची पध्दत अस्तित्वात आहे, त्यासाठी स्वतंत्र शुल्क प्रत्येक पानासाठी रू.२०/- शासनाने निर्धारित केलेले आहे. ते भरुन शोध-अर्ज करून सर्व माहिती अपीलकर्त्यास प्राप्त करून घेता येईल. विषयांकित प्रकरणातील माहिती श्री. जाधव यांना अन्य एका अर्जाद्वारे मागितली होती व आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर त्यांना ती देण्यात आली आहे. स्वतंत्र अर्ज करावयाचा नसल्यास नोंदणी खात्यात सर्व अभिलेख नागरिकांना निरीक्षणासाठी पूर्वीपासून उपलब्ध करून दिले जातात. निरीक्षण करून आवश्यक कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता घेऊ शकतील, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, खंडाळा श्री. आर. पी. गायकवाड व अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सातारा श्री. यु.टी. मेहेत्रे यांनी केले.

अभिलेखासाठी शासनाने पूर्वी शुल्क निर्धारित केले असल्यास त्यानुसार जन माहिती अधिकारी आकारणी करू शकतात. विस्तृत स्वरूपाची माहिती संकलित करून देण्याची अपीलकर्त्याची मागणी मान्य करता येणार नाही. त्यासाठी अभिलेखाचे अवलोकन ते करू शकतात. स्वतंत्र शोध-अर्जाची अट न घालता अपीलकर्त्याने केलेल्या अर्जावरच निर्धारित शुल्क आकारून उपलब्ध माहिती जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, खंडाळा यांनी द्यावी. आठ दिवसात या प्रमाणे कार्यवाही करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार श्री. जाधव अथवा त्यांचे प्रतिनिधी अभिलेख अवलोकनासाठी आले नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, खंडाळा यांनी दि. ८.४.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २८.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सचिन नामदेव हळदकर
८/७४९, त्रिमूर्ती, एस.डी.पवार, शांतीनगर, इचलकरंजी, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.३.२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१९.३.२००९ रोजी घेण्यात आली.

हातकणंगले तालुक्यातील यंत्रमाग सहकारी सोसायटी व ऑटो लूम सहकारी सोसायटी यांच्या सन २००५ पासूनच्या बंधपत्रांची माहिती न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री.सचिन नामदेव हळदकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. त्यांचा मूळ अर्ज प्राप्त झाला नव्हता. राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी तो पहावयास मिळाला. त्यानुसार आपल्या कार्यालयातील अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती दिली. अन्य माहिती सहकारी संस्था स्तरावरील असून व सुमारे २५०० पानांची होईल असा अंदाज असल्यामुळे अपीलकर्त्याने शुल्क भरल्यास व माहिती संकलित करण्यास मुदत मिळाल्यास देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे यांनी केले. ते रास्त आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास त्यानुसार माहिती प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिल आत्माराम इंगवले
आत्म कुसूम, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पेठ,
पो.कबनूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कबनूर,
ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७५ + ५७६ + ५७७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.३.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — श्री. सुनिल आत्माराम इंगवले
आत्म कुसूम, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पेठ,
पो.कबनूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — विस्तार अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
श्री. एस. ए. भोईटे

**जन माहिती अधिकारी** तथा — ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कबनूर,
ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर
श्री. सुखदेव मारूती कांबळे

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मौजे कबनूर, ता. हातकणंगले येथील ग्रामपंचायतीच्या संदर्भात दि. ४.१०.२००८, दि. १३.१०.२००८ व दि. ३०.९.२००८ अशा तीन वेगवेगळ्या अर्जांद्वारे आपण माहिती मागितली होती. जवळ जवळ तीन आठवडे वाट पाहून स्मरणपत्र दिले, परंतु विहित मुदतीत माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हातकणंगले, यांनी तत्काळ व नि:शुल्क माहिती देण्याचे आदेश जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, कबनूर यांना दिले. तरीही जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, कबनूर श्री. सुखदेव मारुती कांबळे यांनी माहिती दिली नाही, म्हणून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. सुनिल आत्माराम इंगवले यांनी केली.

श्री. इंगवले यांनी पंधरा दिवसांत माहिती मागणारे तीन अर्ज दिले. त्यांनी मागितलेली माहिती व्यापक स्वरूपाची होती, तसेच आधीचे ग्रामसेवक श्री. व्ही.व्ही. महाजन यांनी दप्तराचा कार्यभार आपल्याला दिला नव्हता. दि. २५.९.२००८ रोजी आपण रूजू झालो व दप्तराचा कार्यभार श्री. महाजन यांनी ऑक्टोबरमध्ये दिला. माहिती देतो, असे श्री. इंगवले यांना सांगितले होते. परंतु दरम्यान त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हातकणंगले यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी श्री. एस. ए. भोईटे यांनी माहिती तत्काळ व नि:शुल्क देण्याचे आदेश दिले. त्याच दिवशी श्री. इंगवले यांना माहिती देऊ केली, परंतु त्यांनी ती माहिती स्वीकारली नाही. शिपाई व लिपिक यांच्यामार्फत माहिती घरपोच देण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांनी माहिती स्वीकारली नाही. शेवटी रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली, त्याची पोहच सादर आहे. संबंधित पोस्टमन व पोस्ट मास्तर यांनी रजिस्टर्ड टपालाबाबत श्री. इंगवले यांना सूचना दिल्याची प्रत आपल्याला दिलेली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री. सुखदेव मारूती कांबळे यांनी केले.

असे लेखी निवेदन पोस्टमन श्री. राजू अरूण कांबळे व ग्रामीण डाकसेवक (पोस्टमास्तर), कबनूर श्री. बाबू शिवा भाकवे यांनी श्री. इंगवले यांना दिलेल्या सूचनापत्राच्या व मूळ रजिस्टर्ड टपाल त्यांना दिल्याची पोहच असल्याच्या नकलेसह दि. २१.३.२००९ रोजीच्या फॅक्स संदेशाद्वारे सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता देऊ केलेली माहिती अपीलकर्त्याने स्वीकारणे आवश्यक होते, त्याबाबत कोणताही आक्षेप असल्यास नंतर नोंदविता आला असता.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ३० .१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. उत्तम दादाराव म्हस्के
तलाठी नातेपुते, ता.माळशिरस, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस, ता. माळशिरस, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९३ + ५९४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.१.२००९ |
| ३ | उपस्थित | |

**अपीलकर्ता** — श्री. उत्तम दादाराव म्हस्के
तलाठी नातेपुते, ता.माळशिरस, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा — निवासी नायब तहसीलदार, माळशिरस,
ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. एस.एम. पोरे

माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमात या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री. बी.बी. पुट्टलवाड, माजी तलाठी, पानिव, ता. माळशिरस यांनी मागितलेल्या ठिकाणाऐवजी वेगळ्या ठिकाणी बदली देण्यात आली. त्यामुळे हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाला. त्यासंदर्भात मागितलेली माहिती देण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. रणजित रा. भोसले यांनी टाळाटाळ केली. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. एस.एम. पोरे यांनी माहिती दिली. श्री. रणजित भोसले यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. उत्तम दादाराव म्हस्के यांनी केली.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. एस.एम. पोरे यांनी यांनी नमूद केले.

अपीलकर्त्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. रणजित भोसले यांनी सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

योग्य जागी बदली न दिल्यामुळे तलाठ्याचा मृत्यू झाला, हा आक्षेप माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा नाही.

श्री. रणजित रा. भोसले यांनी दि. ३०.१.२००९ रोजी खुलासा आयोगास सादर केला. तत्कालीन परिस्थितीत तहसीलदार, माळशिरस, निवासी नायब तहसीलदार, माळशिरस, निवडणूक नायब तहसीलदार, महसूल नायब तहसीलदार, संजय गांधी योजना नायब तहसीलदार या सर्व पदांचा कार्यभार माझ्याकडेच होता.

"अपीलकर्ते श्री. उत्तम दादाराव म्हस्के यांच्या दि. २०.६.२००७ व दि. ३०.५.२००७ रोजीच्या मूळ अर्जांच्या अनुषंगाने दि. २०.७.२००७ व दि. ३०.६.२००७ रोजी अर्जदार यांना व्यक्तिशः मी माहिती दाखविली होती व स्वीकार करण्यास सांगितले होते. तथापि सदरची माहिती ही आवश्यकतेप्रमाणे उपयोगाची नाही, असे नमूद करुन अर्जदार यांनी स्वीकारण्यास नकार दिलेला होता. अपिलांच्या मूळ अर्जातील माहिती माझ्या कार्यकालामध्ये अर्जदार यांना देण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी केला होता व कोणत्याही प्रकारे कोणतीही माहिती दडवून ठेवण्याचा हेतू

नव्हता." असे श्री. भोसले यांनी या खुलाशात पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे. त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १३.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. अमोल गजानन चंद — अपीलकर्ता
रा. लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली, ता. हवेली, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, ता. हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०० + ६१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५.६.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. अमोल गजानन चंद<br>रा. लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | तहसीलदार, हवेली, ता. हवेली, जि. पुणे<br>श्री. व्ही. पी. पाटील |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | निवासी नायब तहसीलदार, हवेली, ता. हवेली,<br>जि. पुणे श्री. जगदीश ह निंबाळकर |

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ६०० / सातारा | ७.११.२००८ | ८.११.२००८ | ७.१२.२००८ | -- |
| ६१० / सातारा | ७.११.२००८ | ५.१२.२००८ | १०.१२.२००८ | -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ५.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २५.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

फेरफाराबाबतच्या मंजुरीविषयीच्या कागदपत्रांसह माहिती आपण मागितली होती. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली श्री. संदेश शिर्के यांचे वेतन, स्थावर जंगम मालमत्ता इ. बाबतच्या नकला मागितल्या होत्या. तीस दिवसांच्या मुदतीत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली यांनी माहिती दिली नाही. प्रथम अपील केल्यानंतर आधीची तारीख टाकून पत्रव्यवहार केला, तसेच स्वतःचा व आधीच्या अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार लपविण्यासाठी स्वतःच्या अधिकारात श्री. शिर्के यांनी फेरफार नोंद रद्द केली. त्यांच्या निर्णयाची माहिती निवासी नायब तहसीलदार श्री.जगदीश निंबाळकर यांनी दिली नाही. अनधिकृत फेरफाराने जमिनीचे हस्तांतरण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. अमोल गजानन चंद यांनी केली. श्री. चंद यांनी प्रथम अपील केलेले नाही.

प्रकरण चालवून संबंधित नोंद मंजूर झाली आहे. संबंधित फेरफार प्रकरणातील सर्व कागदपत्रे अपीलकर्त्यास समक्ष देण्यात आली असून त्यांची तक्रार असल्यास नोंदीविरूध्द महसूल नियमांतर्गत अपील करणे आवश्यक आहे, याची कल्पना त्यांना दिली आहे. संबंधित संचिका त्यांना दाखविली असून त्यांच्या मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली श्री.जगदीश निंबाळकर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली श्री. व्ही. पी. पाटील यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ३०.३.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.जमाल चॉंद शेख
भाग्योदय, पी.डब्ल्यू, सोसायटी ई-८, नई जिंदगी रोड, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
महाराष्ट्र सेवा संघ, विजापूर रोड, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, नूतन प्रशाला
ज्युनिअर कॉलेज माशाळ वस्ती, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६११ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
महाराष्ट्र सेवा संघ, विजापूर रोड, सोलापूर भालचंद्र जगन्नाथ कस्तुरकर

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, नूतन प्रशाला
ज्युनिअर कॉलेज माशाळ वस्ती, सोलापूर श्री.रमेशचंद्र दिगंबर चौधरी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नूतन प्रशाला ज्युनिअर कॉलेज, माशाळ वस्ती, सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, महाराष्ट्र सेवा संघ, विजापूर रोड, सोलापूर हे एकमेकांचे नातेवाईक असून संस्थेचे सर्वेसर्वा आहेत. श्री.के.डी.चौधरी हे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नूतन प्रशाला ज्युनिअर कॉलेज माशाळ वस्ती, सोलापूर यांचे बंधू असून संस्थेच्या अध्यक्षांचे मेहुणे आहेत. त्यांच्या निलंबनाच्या संदर्भातील माहिती देणे जाणूनबुजून टाळले जात आहे. आपण मागितलेल्या माहितीचा चौकशी चालू असण्याशी काही संबंध नाही. या शाळेत आपण १८ वर्षे सेवा केली असून सेवानिवृत्तीच्या एक महिना आधी श्री.के.डी.चौधरी यांना का निलंबित करण्यात आले, हे सत्य उजेडात यावे म्हणून माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.जमाल चाँद शेख यांनी लेखी निवेदनात केले आहे.

श्री.के.डी.चौधरी यांच्या संदर्भात चौकशी चालू होती. कागदपत्रे चौकशी समितीकडे असल्यामुळे देता येत नसल्याचे अपीलकर्त्यास वेळीच कळविले. अपीलकर्ता शाळेतच घड्याळी तासावर शिक्षक असून संस्थेविरूध्दचा त्यांचा दावा उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. स्वतःला सेवेत कायम केले जावे यासाठी दबाव आणण्याकरिता व त्रा देण्याच्या हेतूने ते सातत्याने अर्ज व पत्रव्यवहार करीत असतात. सन १९९० पासूनची माहिती ते मागत असून वेळोवेळी त्यांना महिती दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नूतन प्रशाला ज्युनिअर कॉलेज माशाळ वस्ती, सोलापूर श्री.रमेशचंद्र दिगंबर चौधरी यांनी प्रतिपादन केले. श्री.शेख यांना सन २००६ पासून केलेले सात अर्ज व त्यावरील कार्यवाही यांचा तपशील त्यांनी आयोगाला सादर केला.

तीच तीच माहिती श्री.शेख पुनःपुन्हा मागतात, भ्रष्टाचार निर्मूलन समिती, शिक्षणाधिकारी यांच्याकडे सातत्याने अर्ज करून ते त्रास देत असतात. शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांच्या तक्रारीबाबत चौकशी करून अर्ज निकाली काढलेले आहेत, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, महाराष्ट्र सेवा संघ, विजापूर रोड, सोलापूर श्री.भालचंद्र जगन्नाथ कस्तूरकर यांनी केले.

चौकशी समितीला सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.१.८.२००९ रोजी सर्व कागदपत्रांच्या प्रती श्री.शेख यांना पाठविण्याचा आल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नूतन प्रशाला ज्युनिअर कॉलेज, माशाळ वस्ती, सोलापूर श्री.रमेशचंद्र दिगंबर चौधरी यांनी दि.७.१.२०१०च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. आयोगाने दि.२८.१.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार त्वरित कार्यवाही न करता सुमारे सहा महिने विलंबाने जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नूतन प्रशाला ज्युनिअर कॉलेज, माशाळ वस्ती, सोलापूर श्री.रमेशचंद्र दिगंबर चौधरी यांनी कार्यवाही केली आहे. ही बाब गंभीर असून श्री. श्री.रमेशचंद्र दिगंबर चौधरी यांनी त्याबद्दल खुलासा करणे आवश्यक आहे. त्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार अपीलकर्त्यास त्वरित माहिती न देणे व आयोगास विलंबाने अहवाल सादर करणे याबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नूतन प्रशाला ज्युनिअर कॉलेज, माशाळ वस्ती, सोलापूर श्री.रमेशचंद्र दिगंबर चौधरी यांनी दि.५.२.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२१.१.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सदाशिव धोंडीराम लाटे — अपीलकर्ता
मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कराड, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत उंब्रज, ता.कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५.६.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — श्री. सदाशिव धोंडीराम लाटे, मु.पो.उंब्रज, ता.कराड, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा — विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कराड, जि.सातारा श्री.आर.एस. दळवी

**जन माहिती अधिकारी** तथा — ग्रामसेवक, ग्रामपंचायत उंब्रज, ता.कराड, जि. सातारा श्री. एस. के. मुल्ला

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.१२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मौजे उंब्रज, ता. कराड, जि. सातारा येथील अनधिकृत बांधकाम पाडण्याबाबत कारवाई करण्याचे आदेश विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी दिले. महामार्गालगत अशा स्वरूपाची अनेक बांधकामे असून फक्त आपल्यावरच कारवाई करण्यात येत असल्यामुळे सर्वांची माहिती मागितली, ती तीन टप्प्यांत देऊनही अपूर्ण आहे. प्रत्यक्ष पाहणी करुन माहिती द्यावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. सदाशिव धोंडीराम लाटे यांनी केली.

ग्रामपंचायतीकडे माहिती उपलब्ध असूनही व आपल्याला न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक असल्यामुळे ४८ तासात मिळण्याची मागणी करूनही त्यानुसार दिली नाही, अशी तक्रार श्री. लाटे यांनी केली.

श्री. लाटे यांना तीन टप्प्यांत माहिती दिली. मागील वीस वर्षांपासूनचे अभिलेख शोधून माहिती देणे आवश्यक होते. सर्व बांधकामाबाबत आलेले अर्ज आदींची १९९९ पासूनची माहिती श्री. लाटे यांना दिली. ग्रामपंचायत मोठी असून सुमारे ४५०० बांधकामांचे सर्व्हेक्षण करण्याचे काम चालू आहे. सुमारे तीन महिन्यांत सर्व्हेक्षण पूर्ण होऊन अहवाल प्राप्त होईल, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, उंब्रज, ता. कराड श्री. एस. के. मुल्ला यांनी केले.

तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत, उंब्रज श्री. चोरगे निलंबित झाल्याने दि. १०.१०.२००८ ला आपण कार्यभार स्वीकारला. त्यानंतर किचकट स्वरूपाची सर्व माहिती अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कराड यांच्या आदेशानुसार श्री. लाटे यांना दिली. माहितीचे स्वरूप लक्षात घेता विलंब होईल याची पूर्वकल्पना त्यांना दिली होती. तसेच ग्रामपंचायतीने जी कार्यवाही केलेलीच नाही त्याची माहिती देणे शक्य नव्हते, असेही जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, उंब्रज श्री. एस. के. मुल्ला यांनी नमूद केले.

अनधिकृत बांधकामाबाबतची नेमकी माहिती व ती पाडण्याबाबतच्या कार्यवाहीचा संपूर्ण तपशील नागरिकांना उपलब्ध करुन देणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसारही ते बंधनकारक आहे. या संदर्भात आयोगाने यापूर्वी अपील क्र. २०३, २०४, २०५, २०६ व २०७ / सातारा मध्ये दिलेला निर्णय या अपिलातही लागू आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.  अपील क्र. २०३, २०४, २०५, २०६ व २०७ / सातारा या अपिलांमध्ये आयोगाने दिलेल्या आदेशाप्रमाणे उंब्रज येथील बेकायदेशीर बांधकामांबाबतच्या अपीलकर्त्यांच्या तक्रारीनुसार प्रत्यक्ष पाहणीवर आधारित वस्तुस्थितीदर्शक अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कराड यांनी दि.१५.२.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा. यानुसार पूर्तता न झाल्यास ते दंडात्मक व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि. १८.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सतीश ज्ञानदेव पाटील
किनारा, ९५, बुधवार पेठ, कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुखधिकारी, कराड नगरपरिषद,
ता.कराड, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, बांधकाम विभागप्रमुख,
कराड नगरपरिषद, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६२८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सतीश ज्ञानदेव पाटील
किनारा, ९५, बुधवार पेठ, कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुखधिकारी, कराड नगरपरिषद,
ता.कराड, जि.सातारा श्री.के.एन.कुंभार

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, बांधकाम विभागप्रमुख,
कराड नगरपरिषद, ता.कराड, जि.सातारा श्री.ए.एन.मुल्ला

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.१.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.२.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१६.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

'पाटील हेरीटेज' या इमारतीचे बांधकाम मंजूर आराखड्यानुसार केलेले नसल्यामुळे इंजिनिअरमार्फत बांधकामाची चौकशी करून आपण उपस्थित केलेल्या प्रश्नांवर मुद्देनिहाय अहवाल देण्याची मागणी आपण केली होती. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम विभाग प्रमुख, कराड नगरपरिषद, ता.कराड, जि.सातारा यानी ती माहिती नाकारली व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी कारवाईचे आदेश न देता केवळ संचिका दाखविण्याचे आदेश दिले. बेकायदेशीर बांधकाम हा सार्वजनिक हिताचा विषय असल्यामुळे प्रत्यक्ष पाहणी करून माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सतीश ज्ञानदेव पाटील यांनी केली.

जागेवर जाऊन बांधकामाची पाहणी करून माहिती देण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नाही. संबंधितांना प्रकरणातील संपूर्ण संचिका दाखवून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती दिल्या. बांधकाम अनधिकृत असल्यास त्याबाबत संबंधितांना नोटीस देऊन बांधकामाची पाहणी केली जाते व त्याबाबत पुढील कारवाई केली जाते, असे जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम विभाग प्रमुख, कराड नगरपरिषद, ता.कराड, जि.सातारा श्री.ए.एन.मुल्ला यांनी निवेदन केले.

संपूर्ण संचिका पाहण्यास देण्यात आली. अजूनही कोणतीही कागपत्रे द्यावयाची असल्यास व त्यांच्या प्रती पाहिजे असल्यास देता येतील, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, ता.कराड, जि.सातारा श्री.के.एन.कुंभार यांनी केले. तसेच १५

दिवसात संबंधित बांधकामाची पाहणी करून अहवाल देण्यात येईल, असेही श्री.के.एन.कुंभार यांनी नमूद केले.

बांधकाम अधिकृत की अनधिकृत, व अनधिकृत असल्यास त्यावरील कारवाई हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय आहे. मात्र बांधकाम अनधिकृत असल्याची तक्रार असल्यास प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून माहिती देणे आवश्यक आहे. तरच माहितीच्या सत्यासत्यतेची शहनिशा होऊ शकेल. अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केल्याप्रमाणे १५ दिवसांत संबंधित बांधकामाची पाहणी करून अहवाल द्यावा. त्यानुसार दिलेल्या माहितीच्या सत्यासत्यतेबाबत अभिप्राय द्यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, ता.कराड, जि.सातारा याना दिले. त्यानुसार दि.७.५.२००९ रोजी जागेवर समक्ष पाहणी करून दि.१८.५.२००९ रोजी माहिती दिली, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम विभाग प्रमुख, कराड नगरपरिषद, ता.कराड, जि.सातारा श्री.ए.एन.मुल्ला यांनी दि.२०.१.२०१० रोजी आयोगाला सादर केला. अहवाल विहित मुदतीत सादर करण्याची समज जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम विभाग प्रमुख, कराड नगरपरिषद, ता.कराड, जि.सातारा श्री.ए.एन.मुल्ला यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.जयद्रथ तुकाराम जाधव
गट नं.७३०/अ, प्लॉट नं.६/ ब ,
शिवशक्ती मैदानाच्या दक्षिणेस,
बार्शी, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
अध्यक्ष/जनरल सेक्रेटरी,
श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी,
जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
प्राचार्य,
बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी,
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३१/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकंडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.२.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.३.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.५.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.८.५.२००७ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. ८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभयघटकांमध्ये निर्गत कार्यक्रमा पासून दोन महिन्यात माहिती निःशुल्क देण्याबाबत तसेच अपिलकर्त्यास माहिती देऊन त्याची पोच मिळाल्यानंतर अपील निकाली काढण्याबाबत प्रपत्रात नमूद केले आहे.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'नुसार मागितलेली माहिती मिळाल्याची दि. ६.१२.२००८ रोजीची पोच जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांनी दि. ७.१.२०१० रोजीच्या पत्रासोबत आयोगास सादर केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १३.१.२०१०

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अरविंद नारायण पवार
मु.पो.पाचवड, ता.खटाव,
जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, विभागीय कार्यालय वडुज,
ता.खटाव, जि.सातारा

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, विभागीय कार्यालय वडुज,
ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **६५०/ सातारा** |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २/१/२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१/१/२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** वीज जोड देताना चूकीचा सर्व्हे करुन चूकीची माहिती दिल्याबद्दल | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अरविंद नारायण पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असल्याचे दिसून येते. वीज जोड देतानाची कार्यवाही चूकीची आहे अशी

अपीलकर्त्याची तक्रार असल्यास, त्यांना प्रशासकीय न्यायिक मार्गाचा अवलंब करता येईल. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत ही बाब निर्णयार्थ येत नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २७-०६-२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. महादेव गणपत गायकवाड
रा. अकलूज, रणजितनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमि अभिलेख,
सोलापूर, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,
माळशिरस, ता.माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.५.२००९ |

**३. उपस्थित -**

**अपीलकर्ता** - श्री. महादेव गणपत गायकवाड
रा. अकलूज, रणजितनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमि अभिलेख,
सोलापूर, जि. सोलापूर श्री. मा. वा. खेडकर

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,
माळशिरस, ता.माळशिरस, जि. सोलापूर श्री. एम.पी. मगर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या जमिनीच्या मोजणीसाठी आलेले अधिकारी व अन्य लोकांनी संगनमताने आपल्या शेताचा बांध फोडला. तो दुरुस्त करावा व झालेली नुकसान भरपाई मिळावी. संबंध नसलेल्या हिश्श्याची मोजणी केल्यामुळे आपण नकला मागितल्या असून गट बुकाची प्रत दिली जात नाही, ती द्यावी व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. महादेव गणपत गायकवाड यांनी केली.

अपीलकर्त्याच्या मागणीनुसार फाळणी नकाशाची व टिपणाची नक्कल देण्यात आली व गुणाकार बुकात अपीलकर्त्याने उल्लेख केलेले सर्व्हे क्रमांक नाहीत, तसेच संबंधित अभिलेख जीर्ण व फाटलेले असल्याने प्रत पुरविता येत नसल्याचे अपीलकर्त्यास कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, माळशिरस श्री. एम. पी. मगर यांनी नमूद केले.

संबंधित गुणाकार बुक अपीलकर्त्यास पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावे व त्यातील त्यांना हवी असलेल्या कागदपत्रांची नक्कल उपलब्ध करुन द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अशतः मान्य.

२. आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, माळशिरस यांनी दि. १५.२.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. २८.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संभाजी दत्तात्रय दिवेकर
मु.पो.वरवंड, ता.दौंड, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.संभाजी दत्तात्रय दिवेकर<br>मु.पो.वरवंड, ता.दौंड, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,<br>दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.९.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.२.२००७ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>मंडल अधिकारी कार्यालय, पाटस यांच्याकडे दि.१६.११.२००६ रोजी दिलेल्या नकाशाची व जबाबाची नक्कल | |

<u>**विवेचन**</u>

**<u>वाचा</u> :-** आयोगाचे समक्रमांकाचे आदेश दि.२२.१०.२००९

आयोगाचे सदर आदेशातील विवेचनामध्ये जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड श्री.निलप्रसाद चव्हाण असा उल्लेख आला आहे, त्या ऐवजी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड श्री.दशरथ डी.काळे असे वाचावे.




**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक :** ३०/ ०९/२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.शरद रामण्णा शेट्टी
प्लॉट नं.१४, प्रेंमप्रभा,
वीरभद्रनगर,गणराज मंगल कार्यालयाजवळ,
बाणेर, पुणे-४५

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.०४.२००६ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.०५.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३१.०५.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.०७.२००६ |
| ६ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.०६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता श्री.शरद रामण्णा शेट्टी गैरहजर होते. उपस्थित जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.अनिरुध्द पावसकर व अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता,

बांधकाम नियंत्रण व विकास योजना, पुणे महानगरपालिका,पुणे-५ श्री.प्रशांत वाघमारे यांनी अपिलार्थी श्री.शरद रामण्णा शेट्टी यांना खात्याकडील पत्र जा.क्र.नअजा/अपिल/१२६५, दि.७.७.२००६ अन्वये प्रत्यक्ष सुनावणीस उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आले. परंतु श्री.शेट्टी अनुपस्थित होते. त्यांचे अर्जात मागणी केलेली माहिती ही जा.क्र.डीपीओ/१६१२,दि.२४.०५.२००६ अन्वये त्यांना देण्यात आलेली आहे असे प्रपत्रात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ३० /०९/२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**